म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १३८८

# झरोका

श्यामकांत कुळकर्णी

REFBK-0022594
REFBK-0022594

४०९६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र.मा.प.)



## श्यामकांत कुळकर्णी

श्री श्यामकांत कुळकर्णी हे एक निष्ठावंत साहित्यिक आहेत. विधात्याकडून लाभलेल्या जीवनावर त्यांचे सतत मनन-चिंतन चालत असते. त्यातून लेखनास स्फूर्ति. जीवनमूल्यं व साहित्यमूल्यं यावर त्यांची सारखीच निष्ठा आहे. दै. 'तरुण भारत' व 'महाराष्ट्र' यातून ललित लेखनास प्रारंभ. कथा, विनोदी-उपहास व्यंगात्मक कविता, पुस्तक समीक्षणे, ललीत-निबंध लेख इत्यादि विविध प्रकारचे लेखन 'स्वराज्य', 'साप्ताहिक गावकरी', 'वीणा', 'चैत्राली', 'युगवाणी' 'सोनाली', 'परिशीलन', 'सौरभ', 'अरूंधती', 'लक्ष्यवेधी', 'तरुण-भारत', 'लोकमत', 'नागपूर पत्रिका' इत्यादि नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहे.

---

प्रदीप मुद्रणालय, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – १०

# झरोका

REFBK-0022594

श्यामकांत कुळकर्णी

मायस प्रकाशन, धनतोली, नागपूर - ४४० ०१२

ज्यांनी वेळोवेळी माझ्या कविता ऐकून उत्स्फूर्त दाद दिली व त्यांना संग्रहरूप देण्याची आग्रह-पूर्वक प्रेरणा दिली त्या माझ्या सर्व रसिक सुहृदांस सादर अर्पण.

— श्यामकांत कुळकर्णी

**प्रकाशक**

अपर्णा सुधीर देव
माग्रस प्रकाशन, चितळे मार्ग,
धनतोली, नागपूर – ४४० ०१२

---

**सर्वाधिकार ©**

सौ. शोभा कुळकर्णी
२ ब, डोंगरे ले–आऊट,
श्रद्धानंदपेठ, नागपूर – ४४० ०१०

---

**आवृत्ती पहिली**

२८ आक्टोबर १९७८

---

**मुद्रक**

श्री. वि. गंधे एम्. ए., डी जे.
प्रदीप मुद्रणालय
उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर – ४४० ०१०

---

**किंमत रुपये चार**

'माग्रस' ही संस्था नाही. ती एक प्रवृत्ती आहे. समाजात साहित्यव्यवहाराबाबत विशिष्ट वातावरण निर्माण करू इच्छिणारी; ग्रंथसंग्रहांपासून ग्रंथप्रकाशनापर्यंत सर्व बाबतीत साह्य करू इच्छिणारी.

---

श्यामकांत कुळकर्णी यांचा 'झरोका' काव्यसंग्रह म्हणजे 'माग्रस'चा नवा प्रामाणिक काव्यशोध.

---

माग्रस प्रकाशने

उन्हउतरणी (काव्य). प्रा. श्रीधर शनवारे ◻ जीवनाचा फेस उठला (काव्य). शिरीष, ◻ साहित्यतोलन (लेख). डॉ. मा. गो. देशमुख ◻ कर्दळ (काव्य). रमेश ललगूणकर ◻ आश्लेषा (काव्य) मालती निमखेडकर.

चलता चलता जीवनपंथे
पाऊल माझे न कधी अडखळले
वळुनि पहावे क्षणभर मागे
कधीच मज ना रुचले

## अनुक्रम


नव्या मानवाची नवी कहाणी – ९
किंचित् क्वचित् कदाचित् – १२
पण तसे होणे नाही – १५
ग्रहांनो – १७
शनीच्या पाराजवळ – १९
तिसरे यहायुद्ध – २१
जवळ जवळ – २३
बदलते फॉर्म्युले – २४
प्रवेश द्वार 'गेटवे' – २५
नातं – २८
कल्चर्ड मीनाताई – २९
कॉम्प्युटर – ३१
कासव आणि ससा – ३५
देव्हारा – ३७
कसोटी सामना – ३९
झाकली मूठ – ४२
वाल्या कोळी अन् वाल्मिकी – ४४
तयारी – ४६
शुभमुहूर्त – ४९
फसगत – ५१
मी जगतो – ५५


---

## ऋण


युगवाणी / स्वराज्य / परिशीलन / अरुंधती

## थोडक्यात

माग्रस कुटुंबातील आमचे आप्त श्यामकांत कुळकर्णी यांचा 'झरोका' हा काव्यपुष्पगुच्छ रसिकांना सादर करण्यात माग्रस प्रकाशनास हार्दिक आनंद होत आहे. आर्थिक पायात अजून बळ आले नसल्याने प्रकाशनाबाबत माग्रसची वाटचाल मंद-गतीची आहे हे सर्वांना विदित आहेच. तथापि प्रकाशनांबाबत जे स्वत: वाटचाल करू इच्छितात त्या माग्रस कुटुंबातील आप्तांना माग्रस साथ देण्यात सदैव तत्पर असते. मोजक्या माग्रस प्रकाशनातील हा वैशिष्ट्यपूर्ण पाचवा सुगंधी पुष्पगुच्छ आहे हे सविनय नमूद करावेसे वाटते.

अपर्णा सुधीर देव

## ‘झरोक्या’ मागे

कवितेची सार्थकता ती ऐकण्यातच आहे. रसिकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिलेल्या कवितेचं ताजेपण जोपासल्या जात असतं. लहानमोठ्या बैठकींमधून व कविसम्मेलनातून रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळणाऱ्या माझ्या काही कवितांना संग्रहरूप मिळावे असे माझ्या किती तरी सुहृदांनी वेळोवेळी मला बजावले आहे.

‘झरोका’ ही त्यांच्या स्नेहार्द्र हाकेला दिलेली नम्र साद आहे. ‘झरोक्या’तून कवितेच्या पंचप्राणांची निःश्वसिते रसिकांच्या प्रत्ययास यावीत या हेतूने दिलेली !

ही साद मला द्यायला लावणारे बोलविते धनी आहेत– श्री. मोरेश्वर व सौ. मालती निमखेडकर, श्री. सुधीर व सौ. अपर्णा देव, श्री. बक्षीजी व श्री. मामासाहेब गंधे– ज्यांचे स्नेहांकित होऊन राहणेच बरे !

श्यामकांत कुळकर्णी

## १ नव्या मानवाची नवी कहाणी !

नव्या मानवाची ऐका
आता नवीन कहाणी

डेक्कन क्वीन जुनी झाली
पंजाब मेलची ओढ राहिली नाही
अंतरिक्षातल्या प्रवासाची
रॉकेटमुळे आली आता पर्वणी. . . . १

विजेचा हीटर जुना झाला
नका आणू प्रेशर कुकर
सूर्यावरच्या बर्शनची
केली अर्धांगीने मागणी. . . . २

लाकडी, रबरी खेळ जुने झाले
प्लास्टिकचे खेळ ठरले तकलादी
राजू – संजूला हवी आता
शुक्राघरची खेळणी. . . . ३

शूटींगसाठी काश्मीरचे बाग जुने झाले
पॅरीसचे चित्रणही पुष्कळ झाले
छायाचित्रणासाठी करतील
सिनेनिर्माते आता चंद्राची मनधरणी.... ८

साहित्यातले विषय आता जुनें झाले
नवे काव्य, नव – कथा सगळेच चर्वितचर्वण
अभ्यासकांना पीएच्. डी. साठी मिळेल
आता नवा विषय "चंद्रलोकीची राहणी". . ९

स्वर्ग आता दोनच बोटे उरला
दिसेल आता नव - ग्रहांचे साम्राज्य
विश्वकर्म्याची लेणी, चित्रगुप्ताचा हिशेब
कल्पतरूचे रोप लावायचे आता अंगणी.... १०

## २ किंचित् – क्वचित् – कदाचित्

किंचित् स्फूर्ति
क्वचित् काव्य
कदाचित् प्रसिद्धी... १

किंचित् धनसंचय
क्वचित् राहणीचे मान
कदाचित् सुखाची जाणीव... २

किंचित् रेशन
क्वचित् अंगकाठी
कदाचित् शूरत्व . ३

किंचित् प्रणय
क्वचित् विवाह
कदाचित् संतति .. ४

किंचित् व्यथा
क्वचित् कथा
कदाचित् लेखक... ५

किंचित् पुण्य
क्वचित् धर्म
कदाचित् स्वर्ग.. ६

किंचित् शिक्षण
क्वचित् व्यासंग
कदाचित् विद्वान्... ७

किंचित् नाट्य
क्वचित् अभिनय
कदाचित् रंगवैभव... ८

किंचित् गळा
क्वचित् रियाज
कदाचित् गानसम्राट् .. ९

किंचित् हृदय
क्वचित् माणूस
कदाचित् माणुसकी... १०

## ३ पण तसे होणे नाही . . . !

कधी वाटते. . . .

तळहातातिल रेषांमधुनी
गतजन्माचे चित्र दिसावे
आणिक् व्हावे नवजन्मातिल भविष्यदर्शन. . . . !

अर्धांगी कधी कॉलेजक्वीन असावी
नसता आपण कॉलेजकुमार
कधि न सरावी ऊब मिठीची
आणि रहावी संतानत्रयी . . !

टी. व्ही. मधुनि कधी घडावे
भगवंताचे विराट् दर्शन
आणिक् रेडियोतुन कानी यावा
गोकुळिचा मंजुळ पावा.... !

आयुष्याच्या अस्ताआधी अवचित
यमराजाचा 'केबल्' यावा आणिक्
यमसदनातुन निजक्षेमाचा
येथे अपुला 'ट्रंकॉल' मिळावा.... !

पण तसे होणे नाही !!

## ४ ग्रहांनो ... !

जन्मलो मी
अन् हंसला तुम्ही ग्रहांनो !
वक्र तुमची दृष्टि
मजला ज्ञात आहे
कुंडलीच्या 'फ्रीज' मधली
दृष्टि तुमची
नित गोठण्याचा
अभिशाप तिजला
जाणून घ्या
पण अता ग्रहांनो !

वसुंधरा तर
ग्रह एक महान
'मानव' ग्रह
महानतम त्यातिल
स्नेह – शांतिमय दृष्टि त्याची !
शाप माना वा
वरदान तुम्ही
नरजन्म तुमच्या
नशीबात नाही
नशीबात नाही !

## ५ शनीच्या पाराजवळ

ऐन चौकातील शनीच्या पाराजवळ
वाहनांची वर्दळ, माणसांची सळसळ
चालते आहे अहोरात्र
आज गर्दीत वाहत चाललेल्या माझे
पाय अकल्पितपणे इथे थबकतात
पादत्राणं दूर सारून पावलं
प्रदक्षिणा घालू लागतात
पण हे महान देवा !
तुला मी काय वाहू ?
बाजूच्या दुकानांतले पुष्पहार
सभा संमेलनांसाठी संपून गेलेत
मिठायांचे ढीग पार्टीसाठी
सत्कारणी लागले आहेत
देवापुढं 'पैसा' ठेवावा, तर

पैशालाही आता मोल नाही
माझ्या खात्यावर काही पुण्य– ?
शक्य असेल असं वाटत नाही
माझं चित्त, माझं मन, माझं हृदय
ते ही निव्वळ भेसळच आहे. . . !
तथापि हे महान् देवा,
माझ्या लेखी मात्र जी पापराशी आहे
ती मात्र निखळ शुद्ध आहे, कारण
ललाटरेषा तिची जननी आहे
तीच तुझ्या चरणी नम्रपणे समर्पण
ती तुला नम्रभावे समर्पण. . . पण
साडेसातीच्या तुझ्या फेऱ्याच्या
भीतीनं नव्हे. . .कारण, आता
जीवनचक्रात अहोरात्र
सर्वत्रच साडेसाती चालू आहे

## ६ तिसरे महायुद्ध

'हं ! . . .कसं काय ?'
'हाय् ! हौ आर् यू ?'
'सबकुछ ठीक . . ओ. के !'
सगळे पोखरलेले शब्द. . . १

अंतरीचा तप्त गाभारा
जिव्हाळयाविना सदा रिता
इथे कोण कधी
वाऱ्याला होता उभा ?. . . २

'इथे कोण कुणाचा ?
कोण कुणासाठी येतो ?'
आहे गीता मुखपाठ. . . ३

पण उरी इच्छा असूनही
ओलावा कसा राखायचा ?
अरे, आहे चाललेले
इथे क्षणोक्षणी एक युद्ध ! ... ४

सदोदित महायुद्ध ...
उध्वस्त – भग्न जीवनाचे
अंतरीच्या अस्वस्थतेशी... ५

महायुद्ध हेच तिसरे
सुरू होऊनही
न च कधी कळलेले
महा मानवाच्या
अवताराविना
नाही आता थांबायचे ! ... ६

## ७ जवळ-जवळ

डॉक्टरजवळ स्मशानाचं भय,
वकीलाजवळ भय, न्यायाच्या अंधतेचं !
व्यापाऱ्याजवळ भेसळीचं भय,
शिक्षकाजवळ भय, अज्ञानाचं !
विद्यार्थ्यांजवळ उत्क्रांतीचं भय,
शेजाऱ्याजवळ भय, दोन ध्रुवांचं !
साहेबाजवळ मोकळ्या मनाचं भय,
वैज्ञानिकाजवळ भय, प्रलयाचं !
नव-साहित्यिकाजवळ मनोरुग्णालयाचं भय,
चिरंजीवाजवळ भय, विद्वत्तेचं !
प्रियतमेजवळ झंझावाती प्रेमाचं भय
स्वत:जवळ भय, अश्रद्धेचं !–अन्
परमेश्वराजवळ पुनर्जन्माचं भय !!

## ८ बदलते फॉर्मुले

तहान लागली की
तेव्हा निर्मल गंगाजलाचा
घोट प्यायला मिळायचा. !
भूक लागायचा अवकाश की
मिष्टान्नाचा घास तेव्हा समोर यायचा... !
अशा ख्यातीच्या या भारत देशात
आता...
सोमरसानंही तहान भागणार नाही
ओंजळभर अमृतानंही भूक शमणार नाही
कारण...
आता लोकशाही सुरू आहे !
लोकशाहीत फॉर्मुले बदलत असतात
सोमरसाचे अन् अमृताचे
तहानेचे अन् भुकेचेही... !
लोकशाहीत फॉर्मुले बदलत नसतात
अफूचे, मदिरेचे अन् हलाहलाचे... !

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २२५९२
शाखा (स्थळ प्रत)

## ९ प्रवेशद्वार ‘गेटवे’

छातीला छाती भिडते आहे
श्वासात श्वास मिसळताहेत
पण मनाचे धागे जुळत नसतात
लोकलमध्ये... १

वेषभूषेच्या नि केशभूषेच्या
दर्शनी समानतेवर
क्षणार्धात लोपत असतात
इथे, तरुणतरुणींमधले भेद... २

इम्पोर्टेड कल्पनेवर
देशी आशय शिपडून
हातोहात खपतात, इथे
बाजारात कलाकृती... ३

सागराच्या किनाऱ्यावर
एका कोपऱ्यात, किंवा
झगमगत्या हॉटेलातील
बुरख्यात विकत मिळतो
इथे, कोवळ्या स्त्रीत्वाचा आस्वाद... ४

इम्पोर्टेड कपड्यातून
इंटिमेट सेंटच्या घमघमाटातून
सतत दरवळत असते
इथे सभ्यता. . ५

कॅन्सरची नि महारोगाची
महावस्त्रं पांघरून
एकेक दिवस मोजत
जगण्याचा विक्रम करतात,
इथले, फूटपाथजीवी लोक... ६

तुमच्या हृदयापेक्षा
तुमच्या पाकिटावरच
चटकन् वळते नजर
इथल्या प्रमदेची अन् जेबकटची... ७

भारताचे नाही
पूर्वेचेही नाही
पश्चिमेसाठीच
हे मुक्त प्रवेशद्वार... ८

## १० नातं

स्वप्नातल्या कळ्या वेचणाऱ्यांनो !
ही फुलं अशी पायी का तुडवता ?
आकाशगंगेचे थेंब टिपणाऱ्यांनो !
ह्या घामाच्या धारा अशाच वाहून जाताहेत
ह्या तुमच्या काळजातलं रक्त
अजून ताजं आहे
व्रणाघात-जीवी हे तुमचं काळीज !
इंद्राचं वज्रही त्याला स्पर्श
करू शकणार नाही
स्वप्नातल्या कळ्या वेचणाऱ्यांनो !
ह्या तुमच्या काळजाशी
सुदर्शन चक्रानं
केव्हाच आपलं नातं जोडलं आहे !

## ११ कल्चर्ड मीनाताई

जॉकीला टोस्ट
मनीला क्रीम
राघूला जेली अन्
पतिदेवांना किचन्
देतात कल्चर्ड मीनाताई .. १

राजूची टच्यूशन
बेबीचं म्युझिक्
स्वत:ची फॅशन
जिवापाड जपतात
कल्चर्ड मीनाताई... २

हाती फोन
पायी अँबॅसिडर
इम्पोर्टेड साडीत (मिरवत)
करतात सोशल वर्क
कल्चर्ड मीनाताई... ३

वेषभूषेचं तसंच
केशभूषेचं साधून मॅचिंग
'त्यांच्या' हाती देऊन
गाडीचं ड्रायव्हिंग
करतात शॉपिंग
कल्चर्ड मीनाताई... ४

चहासोबत वर्तमानपत्र
वामकुक्षी आधी मासिक
रात्रीच्या झोपेसाठी
वाचतात अनुवादित कादंबरी
कल्चर्ड मीनाताई .. ५

पर्समधल्या
ब्लँक चेकच्या आधारे
'प्रगत महिला मंडळा'च्या
अध्यक्षपदी प्रतिवर्षी
अविरोध निवडून येतात
कल्चर्ड मीनाताई .. ६

## १२ कॉम्प्युटर

हनुमंताच्या उड्डाणाची गति
मोजण्याची तुझी ताकद !
पुष्पक विमानापेक्षा
जास्त प्रदेश पादाक्रांत
करण्याची तुझी झेप !
मोजलेल्या क्षणी
योजलेल्या संकेतस्थळी
चंद्राच्या पाठीवर
तू मानवाला, अलगद
पाऊल ठेवायला शिकवलंस !
मंगळावरील खडकातील पाण्याची,
तिथल्या जीवसृष्टीची, संस्कृतीची
जाण तू करून देत आहेस !
चंद्र–मंगळच काय

साऱ्या नवग्रहांनाच
आपल्या तळहातावर
एका रांगेत बसवण्याची तुझी ईर्षा !
सहस्र वसुंधरांच्या
सहस्र शशांकांच्या अन्
सहस्र भास्करांच्या
सीमित क्षितीजांना
भेदून जाणारी तुझी नजर !
तुझी भूक मोठी आहे
ती शमवायला
तुला हव्यात, क्षणोक्षणी
कूटप्रश्नांच्या राशीच्या राशी !
बुद्धिमंतांमध्ये वरिष्ठ, कॉंप्युटेश्वरा !
'तल्लख मेंदूमध्ये कॉंप्युटर मी आहे'
असं तुझं विभूतिमत्त्व आता
भगवंतांना सांगावं लागणार आहे !

पण...
पण तुला कधीतरी
आमच्या नाडीच्या
आमच्या हृदयातल्या स्पंदनांचे
ललत जोगियांचे
स्वर ऐकू येणार आहेत का ?
आता तर..
हव्या त्या देशातील
नियोजित शहरातील
विविक्षित स्थळी
स्वयंचलित प्रलयंकर
आण्विक क्षेपणास्त्रं

पोहचण्याचं गणितही
तू मांडून ठेवलं आहेस !
केवळ...
केवळ मानवी भावी हिताचंच
गणित मांडण्यापासून
कटाक्षानं अलिप्त–उदासीन
राहणाऱ्या कॉम्प्युटेश्वरा !
तुझी ही विलक्षण अलिप्तता
निष्काम कर्मयोग्याची
अलिप्तता मात्र खचित नाही
खचितच नाही !!

## १३ कासव आणि ससा

डोळ्यात आसवं
उभी राहिली नाहीत
म्हणून मनात
दुःखाचे पाझर होऊन
ती वाहतच नाहीत
असं थोडंच आहे ?
वयाच्या अंगरख्यानं
ती पांघरलीत, इतकंच !

गालाबाहेर हंसू
फुटू दिलं नाही
म्हणून अंतरी
गुलाब फुललेच नाहीत
असं थोडंच आहे ?
गालावरच्या सुरकुत्यांनी
त्यांना कुशीत घेतलंय्, इतकंच !
कासवाच्या पावलांनी
वय रेंगाळतंय्
पण... मनातला ससा
अजून तसाच चपळ आहे !

## १४ देव्हारा

मुंगी होऊनच साखर
चाखायची असते
साखरेत गोडी तशीच
असते अवीट... १

भुंग्यांच्या मुखानं
मधुसंचय करायचा असतो
फुलात मकरंद
नेहमीच असतो... २

गरुडाच्या पंखांनी
झेप घ्यायची असते
आकाश सदोदित
विस्तारलेलंच असतं... ३

धूपाच्या गंधानं
दरवळायचं असतं
देव्हाऱ्यात बसायला
मिळावं म्हणून. .!

देवळात गर्दी
तशीच असते
वाढत जाणारी ! . . . ४

## १५ कसोटी सामना

नाणे फेकुन, 'टॉस्' जिकुन
विधात्याकडुनि
घेतला जन्म माणसाचा !
आणि मांडला...
आयुष्याच्या 'मैदाना'तच
सामना कसोटीचा !

बाळबोध स्वभावाची
झाली तयार 'पीच्'...
पदवी परीक्षेच्या
काढिल्या काही 'धावा'... अन्
अथक प्रयत्नांचे
लाविले फटक्यावर 'फटके'
कधी चौकार... कधी षट्कार
पण. . बेकारीतच
राहिलो 'नाबाद'
पाव शतकवर्षे !

‘शतक’ पुरे केले
अर्जांचे नि आर्जवांचे...
अन् जाहलो प्रभू
कलमसेवेच्या पदाचा !...

केली भीष्मप्रतिज्ञा
प्रीति विवाहाची
बांधुन कंकण हाती
प्रणय– ‘फलंदाजी’चे !

चौकात टाकिले तंबू
अडविण्या कटाक्षचेंडू
मृगनयना मोहिनींचे !
पण... ठरले कटाक्ष ‘गुगली’

अन् दूर उडाली ‘दांडी’
‘उपहार–चहापान’ प्रतीक्षेची !
शतक पुरे केले
आर्जवी प्रीतिपत्रांचे...

पण. . जाहलो कटिबद्ध
विवाहोत्तर 'फॉलोऑन' प्रणयासाठी !
अन्... जाहलो प्रभू
संसार सेवा–पदाचा...
सारेच जाणती अता
"आहे खरा 'कर्णधार'
घरंदाज त्रिकोणी कुटुंबाचा !"

कुजबुजती परि...
कुणी वैरी एकांती
"टॉस्चे नाणे होते नकली
अन् सामनाच राहिला अनिर्णीत"
पण... खंत न मजला कसली...
विश्वासच माझा न
कुणा अम्पायरवरती. . !

## १६ झाकली मूठ

पापणीला पापणी मीही लावली होती
झोप मात्र 'इतरां'नाच मिळाली
डोळे तर मीही उघडले होते
दिशा मात्र 'त्यांना'च लाभली

माझे डोळे पाझरतच राहिले
'त्यांच्या' आसवांची मौक्तिकं झाली
पुढं पावलं मीही टाकली होती
गति मात्र 'त्यांना'च मिळाली

क्षणन् क्षण मी वेचला होता
क्षण 'त्यांचा'च चिरंतन ठरला
अक्षरन् अक्षर मी जोपासलं होतं
शब्द 'त्यांचा'च खरा ठरला

माझा श्वास मंदावला आहे
निःश्वास त्यांचा कृतार्थ ठरला आहे
पण... मूठ 'त्यांची' झाकलेली आहे
अन्, माझ्या तळहातातील
रेषेच्या तारेवर
माझं इमान उभं आहे

## १७ वाल्या कोळी अन् वाल्मीकी

अभिव्यक्तीच्या पायात
जेव्हा शृंखला पडतात अन्
गळ्याभोवती पाश आवळले जातात
तेव्हा तिच्या काळजात
होते एक खोल जखम...
एक ओली जखम...
रक्ताचा एक टिपूसही
बाहेर दिसू न देणारी !

अभिव्यक्तीच्या पायात
जेव्हा शृंखला पडतात
तेव्हा वाल्या कोळी
'वाल्या कोळी'च राहतो
अन् वाल्मीकि राहतो मूर्छित
कारण त्याची ऋतंभरा प्रज्ञा
असते निद्रिस्त !

आणि ह्या खोल जखमेची वेदना
जेव्हा शिगेला पोहचते
तेव्हा तिचे कासावीस झालेले प्राण
तांडवनृत्य करू लागतात
अन् तिच्या पायातील
बेड्या दुभंगून जातात

गळ्यातीऊ पाशांचे
कणन् कण वेगळे होतात
आणि... जेव्हा वाल्या कोळ्याच्या अंतरंगात
ऋतंभरा प्रज्ञा
संचार करू लागते
त्याला महाकवि पदावर
अभिषिक्त करण्यासाठी
तेव्हा इंद्रांची आसनं
डळमळू लागतात
अन् त्यांचे मुकुट
क्षणार्धात बदलले जातात.

## १८ तयारी

जायचं तर आहेच एकदा
केव्हाही .. कोणत्याही दिवशी
कामगिरीबद्दल काय विचारता ?
कोणती कामगिरी ती
उघडपणं सांगितलीत का कधी ?
अगदी नकोसा झालाय् आता
तो लपंडावाचा खेळ
कार्डस् ओपन न करण्याचा खेळ

मागचे पुढचे संदर्भ लपवता
अन् कामगिरीबद्दल जाब विचारता ?
देहांचे अंगरखे बदलत
नकोय् हे असं 'इंटरव्हल्'चं जिणं

पुन: प्रवेशाचं बोलूच नका
चक्रव्यूहांचे अन् गनिमी काव्याचे
सापळे आधी उचलून घ्या

... 'त्याची' लाख इच्छा असेल
आम्हाला 'वन्समोअर' देण्याची
पण आपल्याला खरं म्हणजे
वैतागच आलाय्
सारं 'स्ट्रिक्टली कॉन्फीडेन्शीयल्' ठेवण्याचा
हातातच लक्ष्मणरेषा अन्
त्या हातांनाच उल्लंघायला सांगता ?
कपाळावरच्या घामानं का
कपाळावरच्या रेषा मिटणारेत् ?

पाप–पुण्य, स्वर्ग–पाताळ
ह्यांचे ठसे आधीच
कपाळावर मारून ठेवलेले आहेत
ते ही लपवून ठेवता अन्
फिरून येरझारा करायला सांगता ?

.. म्हणून ठरवलंय् आता
जायचं आहेच तर
म्हणाल त्या दिवशी
म्हणाल त्या क्षणी, जायची
आपली तयारी आहे.

## १९ शुभमुहूर्त

केवळ कैकेयीच्या पोटी
जन्म घेतला नाही म्हणून
श्रीरामा ! तुला चौदा वर्षे
वनवास पत्करावा लागला !

धृतराष्ट्राचं पितृपद
लाभलं नाही म्हणूनच
युधिष्ठिरा ! तुला बारा वर्ष
वनवास नि एक वर्ष अज्ञातवास
सहन करावे लागले

मायेचा नि वात्सल्याचा वर्षाव
फक्त भरतालाच किंवा
दुर्योधनालाच लाभणार असतो

आणि मला मात्र...
मायासागर, दयानिधी
जगदीश्वराचं पितृपद लाभूनही
मनीच्या साऱ्या अभिलाषांपासून
आयुष्यभर वनवासच लाभला आहे

कारण ..
मी जन्मलो तेव्हा
शुभमुहूर्तंच नव्हता, असं
सारे ज्योतिषाचार्य सांगत असतात

22४०२
काव्य २३९८

## २० फसगत

या अफाट शहरात
पहाट झाली असं समजून
एक कावळा काव्काव्
करून प्रामाणिकपणं
आपलं कर्तव्य बजावतो आहे
पण त्याला कळत नाही की
पहाट व्हायला अजून बराच वेळ आहे
अजून तांबडंही फुटलं नाही
झुंजुमुंजु देखील झालं नाही
म्हणून काकमहाशय, अजून थोडी झोप घ्या.

जरा डोळे किलकिले करून बघा
हा मर्क्युरी दिव्यांचा झगमगाट आहे

रविकिरणांशी यांचा कसलाच संबंध नाही
चंद्रप्रभेशीही त्यांचं नातं नाही
म्हणून महाशय, अजून थोडं स्वस्थ पडा

थोडा वेळच कां ?
पहाट झाल्यावरही तुम्ही निःशब्द रहा
अहो, उषःकाल होण्यापूर्वीच
हे अफाट शहर आपोआप जागं होतं...

... मिलच्या भोंग्यांच्या धाकानं
जम्बो जेट्च्या घरघरीनं
म्हणून महाशय, तुम्ही
या घनदाट वस्तीतून
दूर, समुद्र किनारी
एखाद्या झाडावर जाऊन विश्रांति घ्या.

या अफाट शहराचा
दिवस जागवायला
तुमच्या कंठशोषाची गरज नाही.
तिथं वेदमंत्रांचे घोष नि
कुराणातले . . , बायबलचे शांतिपाठ
ऐकायला कुणाला फुरसत नाही
तिथं तुमची वेळीअवेळी केलेली
काव्‌काव्‌ कुणाला ऐकवणार आहे ?

या अफाट शहरातून चिमणी केव्हाच
चिव्‌चिव्‌ न करता
रानात निघून गेली आहे !
राघू–मैना रानात जाऊनच
मंजुळ बोली बोलू लागले आहेत.

काक महाशय, तुम्ही या फ्लॅट्वरून
चटकन् उठा नि सागरतीरी जा
कारण... या फ्लॅट्मधनं कुणी
अकस्मात् जरी 'राम' म्हणेल
तरी पिंडदानाच्या वेळीसुद्धा
तुमची गरज या शहरात भासणार नाही.

## २१ मी जगतो

माझ्या श्वासांवर नाही
तुमच्या ममतेच्या नजरेवर जगतो
इथल्या अन्नावर नाही
आपलेपणाच्या शिदोरीवर जगतो
श्वासांवर जगतो फक्त देह
अन् अन्नावर चालतं केवळ शरीर
तुमच्या पुढं जाण्यासाठी नाही
तुमच्या सह चालत रहावं म्हणून जगतो १

इथं कुणाला हवाय् राजमुकुट
त्या राजमुद्रा नि ती राजपत्रं
तुमच्या सोबतीनं
सहभोजनाचे चार घास
खाता यावे म्हणून जगतो २

२२५९०
ग्रं. क्र. काव्य
२३१८
शाखा (स्थळ

इथं कुणाला हवीयत्
विनाश्रम ओंजळभर नाणी,
पूर्वजांची सुवर्णपात्रं,
नि सोडतीच्या लक्षमुद्रा
मजल्यावर मजले
उभारण्यासाठी नाही
तुमच्या विश्वासाच्या
पर्णकुटीत राहता यावं म्हणून जगतो ३

REFBK-0022594
REFBK-0022594

इथं कुणाला हवेयत्
विना सायास अनुग्रह
भाटांचे चौघडे अन्
पाठीराख्यांचे तराणे
माझ्या नाडीच्या तालासाठी नाही
तुमच्या सख्यत्वाच्या
सूरांसाठी जगतो ४

• •